# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र १२७ दिनांक- १४/०५/२०२१

## मानसी ऑर्केस्ट्रा रेस्टॉरंट ॲण्ड बारवर अतिक्रमण पथक,मिराभाईंदर महानगरपालिका यांचेकडुन तोडक कारवाई करुन हॉटेलची इमारत केली जमीनदोस्त.

दिनांक ०८/०५/२०२१ रोजी पहाटे ०३.०० वाजताचे सुमारास मानसी ऑर्केस्ट्रा बार ॲण्ड रेस्टारंट नावाचे हॉटेलमध्ये काशिमीरा पोलीस स्टेशन कडुन कारवाई करुन काशिमीरा पोस्टे ला गुरनं. ३७१/२०२१ भादवि कलम ३०८, २७०, २७९, ३४ व इतर अधिनियमान्वये गुन्हा दाखल करुन गुन्हयात हॉटेलचा मॅनेजर/स्टाफ तसेच ग्राहकांना अटक केली होती. नमुद गुन्हयाचे घटनास्थळी मुलींना लपविण्याकरीता अनधिकृत रुम (कॅविटी) बांधण्यात आली होती.

सदर प्रकरणी काशिमीरा पो.स्टे. कडुन वरिष्ठांचे मार्फतीने मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना पत्रव्यवहार केला होता. अतिक्रमण पथक, मिरा भाईदंर महानगरपालिका यांनी आज रोजी ११.३० ते १२.३० वाजेच्या कालावधीत नमुद मानसी ऑर्केस्ट्रा बार ॲण्ड रेस्टारंट या हॉटेलचे संपुर्ण बांधकाम तोडुन अतिक्रमण पथकाने कारवाई केली आली आहे.







Scanned with CamScanner